# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईत राबविण्यात येणाऱ्या रोप-वे प्रकल्पाबाबत

**(१) ६५३८३ (१६-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत येणाऱ्या प्रवाशांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी शासनाने बोरीवली ते ठाणे, घाटकोपर ते वाशी, वाशी ते बेलापूर व नेरळ ते माथेरान असा रोप-वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील प्रचंड वर्दळीमुळे वाहतुकीवर पडत असलेला ताण व वाहतुकीची होत असलेली कोंडी यासाठी मुंबईतील रोप-वे प्रकल्पाप्रमाणेच नवी मुंबईत वाशी ते ऐरोली, ऐरोली ते भांडूप व घणसोली ते कांजुरमार्ग असा रोप-वे प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने सर्व्हेक्षण करण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सर्व्हेक्षण करण्यात आले आहे काय व त्यानुसार नवी मुंबईमध्ये रोप-वे प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :**(१), (२), (३) व (४) बोरीवली ते ठाणे व घाटकोपर ते वाशी असे दोन रोप - वे प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे.

---

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा पारसिकनगर येथिल मलनि:सारण प्रकल्पाचे काम बंद करुन इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत

**(२) ८६५२० (२३-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा पारसिकनगर येथिल मलनि:सारण प्रकल्पाचे काम बंद करुन सदरचा प्रकल्प इतरत्र स्थलांतरीत करण्याच्या मागणीसाठी येथील नागरीकांनी दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरीकांनी जिल्हाधिकारी, ठाणे, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन आढळून आले नाही, असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले असल्यास नियमोचित कार्यवाही करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (पी.एस.सी.डी.सी.एल.) या कंपनीला शासकीय दर्जा देऊन करामध्ये सवलत देण्याबाबत

**(३) ८८७१८ (२३-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी योजनेंतर्गत "पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (पी.एस.सी.डी.सी.एल.) या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये शासनाचे ५१% भाग भांडवल नसल्याने सदर कंपनीला खाजगी कंपनीचा दर्जा मिळाल्यामुळे कॅगने शासकीय दर्जा देण्यास आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय दर्जा न मिळाल्याने पी.एस.सी.डी.सी.एल. ह्या कंपनीच्या ३००० कोटी रुपयांच्या उलाढालीवर पुणेकरांना तब्बल ९०० कोटी रुपये कर भरावा लागणार असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पी.एस.सी.डी.सी.एल. या कंपनीला शासकीय दर्जा देऊन करामध्ये सवलत देण्याबाबतची मागणी पुणे महानगरपालिकेच्यावतीने शासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपनीला विशेष दर्जा देऊन करामध्ये सवलत मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. ची स्थापना शासनाकडील शासन निर्णय क्र. स्मार्टसि.२०१६/प्र.क्र.९४/नवि-२३ दिनांक १४ मार्च, २०१६ अन्वये झाली आहे.

(२) पुणे स्मार्ट सिटी शहरी पातळीवर कंपनी कायदा २०१३ अंतर्गत स्थापन झाली असून सदर कंपनी मध्ये महाराष्ट्र शासन व पुणे महानगरपालिकेचा ५०:५०% सहभाग आहे. नियंत्रक आणि लेखापरीक्षक यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. ५०१/सी/५/३५-२०१६ दिनांक २५ मार्च, २०१७ अन्वये पुणे स्मार्ट सिटी ही शासकिय कंपनी नसून खाजगी कंपनी असल्याचे पुणे महानगरपालिकेला कळविले आहे.

(३) पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना अंतर्गतच्या उलाढालींवर पुणेकरांना कोणताही कर भरावा लागणार नाही.

(४), (५) व (६) • याकामी पुणे विशेष उद्देश वहनाने केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी विकास मंत्रालय यांच्याकडे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करामध्ये सवलत मिळणे कामी दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजीच्या पत्राव्दारे विनंती केली होती.

• सर्व शहरांसाठी प्रातिनिधीक असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दिनांक ०२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमधील सफाई कामगारांच्या समस्येबाबत**

**(४) ९०६१३ (२३-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये मागील १५ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या ३०५ कंत्राटी सफाई कामगांराना अद्यापर्यंत सेवेत समाविष्ट करण्यात आलेले नसून महानगरपालिकेच्या लोकसंख्येनुसार २५०० सफाई कामगारांची कामे १२५० कामगार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात सफाई कामगारांचे जीवनमान उचविण्याकरिता महानगरपालिका प्रशासनाने अद्यापपर्यंत एकही योजना राबविली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण ११९० सफाई कामगार कार्यरत असून, महापालिका क्षेत्रातील साफसफाई कामासाठी खाजगी कंपन्यांकडून ४१५ सफाई कामगारांमार्फत स्वच्छतेचे काम करुन घेण्यात येते.

(२) व (३) सफाई कामगारांचे जीवनमान उंचविण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना शासनाच्या धोरणानुसार नियुक्ती देण्यात येते.

• सफाई कामगार सेवेत असेपर्यंत महापालिका निधीतून बांधण्यात आलेल्या सदनिकांचे भाडे तत्वावर निवासस्थान म्हणून वाटप करण्यात येते.

• सफाई कामगारांना सफाईसाठी लागणारे फावडा, झाडू, मास्क, गमबुट, रेनकोट, चप्पल, गणवेश, साबण, टॉवेल, क्रिम पावडर, हॅण्डग्लोज इत्यादी साहित्य पुरविण्यात येते.

• शैक्षणिक अर्हतेनुसार सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येते.

• सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना सफाई मुकादम, लिपिक, स्वच्छता निरीक्षक या पदावर प्रभारी नियुक्ती देण्यात आली आहे.

• सफाई कामगारांची आरोग्य शिबिरांतर्गत वेळोवेळी वैद्यकीय तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी सांडस (ता.हवेली, जि.पुणे) येथील कचरा डेपोबाबत**

**(५) ९२३३१ (२३-०८-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी सांडस (ता.हवेली, जि.पुणे) येथील वन विभागाची जागा शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेला उपलब्ध करून देण्याची माहिती दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी सांडस येथील कचरा डेपोला विरोध करण्यासाठी सर्व पक्षिय रस्ता रोको दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाडेबोल्हाई येथील पुरातन बोल्हाई माता मंदिर परिसरात वन विभागाच्या जागेत हा कचरा डेपो होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी सांडस येथील प्रस्तावीत कचरा डेपो महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) पिंपरी सांडस प्रकल्पाविरोधात आंदोलन करण्याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी, पुणे यांना कचराडेपो विरोधी संघर्ष समितीने पाठविले होते.

पिंपरी सांडस येथे कचरा डेपो प्रस्तावित नसून कचऱ्यापासून रिनिव्हॅबल एनर्जी प्रकल्प होणार आहे.

सदरचा प्रकल्प मौजे पिंपरी सांडस ता.हवेली, जि.पुणे येथील वन ग.न.४९३ मधील १९.९० या क्षेत्रात होत असून तो वाडेबोल्हाई येथील पुरातन बोल्हाई माता मंदीर परिसरापासून सुमारे ९ कि.मी. इतका दूर आहे.

कचरा डेपो प्रकरणी जमिन उपलब्ध करुन घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत**

**(६) ९५०७७ (०१-०१-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या ४ सहाय्यक आयुक्तांना अनधिकृत बांधकामांना सहकार्य करणे, आरक्षित व नाविकास क्षेत्रामध्ये तसेच शासकीय व खाजगी भूखंडावर होत असलेल्या अनधिकृत बांधकामांकडे हेतूत: दुर्लक्ष केल्याबद्दल दोषी आढळलेल्या प्रभाग समितीच्या ४ सहाय्यक आयुक्तांना माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात बडतर्फ करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरीत लवादाचा निर्णय आल्यानंतर अनधिकृत बांधकाम प्रकरणी कारवाई करीत असल्याचे चित्र निर्माण व्हावे म्हणून या महानगरपालिकेतील फक्त ४ सहाय्यक आयुक्तांवर कारवाई करुन अन्य प्रभागात होत असलेल्या व झालेल्या बेकायदेशीर बांधकामांना सहकार्य करणाऱ्या सहाय्यक आयुक्तांविरुध्द कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विकास आराखडयातील तसेच नाविकास क्षेत्र व शासकीय भूखंडावर ज्या व्यक्ती व संस्थांनी बेकायदेशीर बांधकामे केलेली आहेत अशा सर्व बांधकामांविरुध्द वसई-विरार महानगरपालिकेने कोणती दंडात्मक वा निष्कासनाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील विकास आराखडयातील आरक्षित भूखंड, नाविकास क्षेत्रामध्ये तसेच शासकीय भूखंडावर बांधकामे केलेल्या अनधिकृत बांधकामांची खरेदी-विक्री भविष्यकाळात होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा संबंधीत भूखंडांना होणारा पाणी, वीज पुरवठा तातडीने बंद करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने बेकायदेशीर/ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक हलगर्जीपणा, उदासिनता दाखविणाऱ्या ४ सहायक आयुक्तांना दिनांक ३०.१०.२०१७ रोजी सेवेतून निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

यापुर्वी वसई-विरार शहर महानगरपालिकेत दोन प्रभारी सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांच्या प्रभाग समिती क्षेत्रातील बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक हलगर्जीपणा, उदासिनता, दिरंगाई दाखविल्याचे आढळून आल्यामुळे त्यांना सेवेतून निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) जी बांधकामे शासकीय अथवा विकास आराखड्यातील आरक्षणांच्या जागांवर विनापरवाना झालेली आहेत. त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३ व ५४ नुसार अनधिकृत बांधकामांना नोटीसा देणे, गुन्हा दाखल करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी निष्कासनाची कार्यवाही केली जाते व करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण ठराव क्र.१९, दिनांक २०.०२.२०१७ तसेच शासन निर्णय दिनांक ०७.१०.२०१७ अन्वये मंजूर केलेल्या धोरणानुसार जी अनधिकृत बांधकामे नियमित होण्यासारखी आहेत, त्या ठिकाणी दंडात्मक शुल्क व इतर शुल्क आकारून नियमित करण्यात येतात.

(४) शासन परिपत्रक दिनांक ०३.०५.२०१८ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. अधिकृत बांधकामांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(५) हे खरे नाही.

---

**मुंबईतील हजारो इमारतींमध्ये अग्निसुरक्षेचे (फायर सेफ्टी) नियम मोडले जात असल्याबाबत**

**(७) ९५६७० (०१-०१-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हजारो इमारतींमध्ये अग्निसुरक्षेचे (फायर सेफ्टी) नियम मोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तब्बल ८ हजार ८४० इमारतींची अग्निसुरक्षेच्या दृष्टीने पाहणी केली असता यातील सुमारे ४ हजार ५९२ इमारतींनी फायर सेफ्टी नियमांचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार मुंबईतील इमारतींमध्ये अद्यावत अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) व (२) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३० नोव्हेंबर २०१७ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील इमारतींमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांची पाहणी केली असता, ४६४७ इमारतींच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांमध्ये त्रुटी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

(३) व (४) सदर ४६४७ इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावून त्यांना ठराविक मुदतीमध्ये त्रुटींची पुर्तता करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले.

सदर इमारतींपैकी ४६३७ इमारतींनी त्यांना दिलेल्या मुदतीत अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटींची पुर्तता केली आहे.

ज्या १० इमारतींनी त्रुटींची पुर्तता केली नाही त्या इमारतींविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खटले दाखल करण्यात आले आहेत.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(८) ९५७२९ (३०-१२-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीवर असणारी अतिक्रमणे निष्कासित करून या जमिनी नगरपरिषदेच्या ताब्यात घेतल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नगरपालिका हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करून जमिनी ताब्यात घेण्याबाबत नगरपालिकेस कोणत्या अडचणी येत आहेत,

(३) असल्यास, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे कधीपर्यंत निष्कासित करून जमिनी ताब्यात घेण्यात येणार आहेत तसेच अतिक्रमणे न हटविणाऱ्या नगरपरिषदेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि नगरपरिषद मंजूर विकास योजनेत आरक्षणाखालील जमिनी नगरपरिषदेच्या ताब्यात देण्याकरिता महसूल विभागाकडे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सदर आरक्षणाखालील शासकीय जमिनी सद्यस्थितीत अतिक्रमणरहीत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील मौजे बेलवली येथील रेल्वे फाटका जवळील स्मशानभूमीची संरक्षण भिंत तोडून बेकायदेशीरपणे रस्ता करून देण्यात आल्याबाबत**

**(९) ९५७४१ (०१-०१-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील मौजे बेलवली येथील रेल्वे फाटका जवळील स्मशानभूमीची संरक्षण भिंत तोडून विकासकाच्या हितासाठी बेकायदेशीरपणे रस्ता करून देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद् नुसार बेकायदेशीरपणे विकासकाच्या फायद्यासाठी स्मशानभूमीची संरक्षण भिंत तोडून रस्ता करणाऱ्या नगरपरिषदेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या अहवालानुसार मौजे बेलवली येथे स.नं.५२ च्या स्मशानभूमीच्या भिंतीला बाधा न येऊ देता विद्यमान ६.० मी. रूंदीच्या रस्त्यापासून खाजगी जमिनीतूनच पोच रस्ता दर्शवून स.नं ५०/१ व ५१/१ येथील इमारतीला बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

(२) अशी प्रकारचे कोणतेही बेकायदेशीर बांधकाम झाले नसल्याचे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील मार्केट मधील गाळेधारकांना करण्यात आलेली भाडेवाढ**

**(१०) ९६१४४ (०१-०१-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील मार्केट मधील गाळेधारकांना करण्यात आलेली भाडेवाढ ही मार्केटची सद्यस्थिती, ठिकाण व घसारा याचा विचार न करता करण्यात आल्याने गोळेधारकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भाडेवाढीबाबत मार्केटमधील गाळेधारकांची बाजू विचारत घेवून त्यावर योग्य तो तोडगा काढण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८)** :(१) व (२) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त,कोल्हापूर महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात आय.आर.बी.कंपनीच्या वतीने राबविण्यात येणारे रस्ते प्रकल्प अर्धवट स्थितीत असल्याबाबत**

**(११) ९७९९७ (३०-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात आय.आर.बी. कंपनीच्या वतीने राबविण्यात येणारे रस्ते प्रकल्प अर्धवट स्थितीत असल्यामुळे छोटे-मोठे अपघात होऊन अनेक निष्पापांचे बळी गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्धवट कामाचे वसूल करण्यात आलेले २५ कोटी रुपयांचे डिपॉझिट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार शहरात आय.आर.बी. कंपनीच्या वतीने राबविण्यात येणारे रस्ते प्रकल्प अर्धवट स्थितीत आहेत, ही वस्तूस्थिती आहे.
(२) व (३) कोल्हापूर शहर एकात्मिक रस्ते प्रकल्पांतर्गतची कामे अपूर्ण असल्याने ती पुर्ण करून घेण्यासाठी आय.आर.बी. कंपनीची रू.२५ कोटीची बँक हमी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे जमा आहे.
• सदर बँक हमीस दि.१३.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा तालुका तसेच शहरातील परिसरात उघडयावर होत असलेली मांस विक्री बंद करण्याबाबत**

**(१२) ९८६५६ (३०-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा तालुका तसेच शहरातील परिसरात उघडयावर होत असलेली मांस विक्री बंद करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाच्या वतीने नायब तहसिलदार यांना माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. दि.०४.१०.२०१७ रोजी असे निवेदन सादर करण्यात आले आहे.

(२) निवेदनाच्या अनुषंगाने शहरातील मांस विक्रेत्यांशी चर्चा करून त्यांना पर्यायी जागा देणेबाबत नगरपरिषद सिंदखेडराजा यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हयामध्ये पंतप्रधान आवास योजने सहित घरकूल योजनेबाबत

**(१३) ९९०७२ (३०-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयामध्ये पंतप्रधान आवास योजनेसहित घरकूल योजनेसाठी पात्र २३ हजार ३३० लाभार्थ्यांपैकी फक्त ९ हजार ३४९ लाभार्थ्यांकडे स्वमालकीची जमीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ हजार ९८१ घरकूल लाभार्थी घरकूलापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबतीत शासकीय अधिकाऱ्यांनी तुकडेबंधी कायदा अट शिथील करणे, बीगर शेती अट शिथील करणे, शासकीय जागेचे रेखांकण करून लाभ देणेबाबत कुठलीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय जागेतील रहिवाश्यांना घरकूल योजनेचा लाभ मिळणेबाबत व घरकूलासाठी तुकडे बंदी कायदा व बीगर शेती अट शिथील करून तीन ते चार मजली इमारत बांधून घरकूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०६-२०१८) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत केंद्र शासनाच्या PMAY-MIS प्रणालीवर पुणे शहरामधून योजनेतंर्गत ४ घटकांमध्ये घरकुल मागणीबाबत खालीलप्रमाणे अर्ज केले आहेत :-

घटक क्र.१ (ISSR) - ५८०१६

घटक क्र.२ (CLSS) - ७६६५१

घटक क्र.३ (AHP)- ५८४३९

घटक क्र.४ (BLC) - २४३४६

योजनेतंर्गत घटक क्र.१, ३ व ४ अंतर्गत प्राप्त लाभार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी आणि पात्रता संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत यांच्यामार्फत करण्यात येते. घटक क्र.४ अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तिक स्वरुपात स्वत:च्या मालकीच्या जागेवर घर बांधण्यासाठी पात्र लाभार्थीस अनुदान देण्यात येते. पुणे जिल्हयातून घटक क्रमांक ४ अतंर्गत कोणताही प्रस्ताव अंमलबजावणी यंत्रणाकडून सुकाणू अभिकरणास प्राप्त झालेला नाही.

(२) ज्या अर्जदारांकडे स्वत:च्या मालकीची जमीन नाही, ते अर्जदार घटक क्र.४ ऐवजी घटक क्र.१,२ व ३ नुसार पात्र ठरल्यास या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

(३) व (४) याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आणि त्यांस अनुसरुन राज्य शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयात कोणतीही तरतूद नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाकण नगरपरिषदेच्या हद्दीतील गायरान जमीन म्हाडा प्राधिकरणाकडे वर्ग न करण्याबाबत**

**(१४) १००३६५ (०१-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वासाठी घरे या योजनेच्या अनुषंगाने चाकण नगरपरिषदेच्या हद्दीतील गायरान जमीन म्हाडा प्राधिकरणाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने नगरपरिषदेला कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण नगरपरिषद ही नवनिर्मित नगरपरिषद असून औद्योगिकदृष्ट्या वेगाने विकसित होणारे शहर असून १ लाखापेक्षा जास्त स्थलांतरित लोकसंख्या शहरात असून नागरिकांना पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विकास आराखड्याचे कामाकरिता मोठ्या जागेची कमतरता भासत असल्याने नगरपरिषदेच्या हद्दीतील जागा म्हाडासाठी वर्ग न करण्याबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या हद्दीतील जागा वर्ग न करण्याबाबत शासन स्तरावरून अद्यापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त जागा म्हाडा यांस प्रदान केली असल्याचे संबंधित लोकप्रतिनिधींना दि.२६.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहरात (जि.सोलापूर) मोठया प्रमाणात डेंगयुची साथ पसरली असल्याबाबत**

**(१५) १०१७०४ (०३-०१-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात (जि.सोलापूर) मोठया प्रमाणात डेंगयुची साथ पसरली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनूसार शहरात एकाही रुग्णाचा डेंग्यूने मृत्यु झाला नाही अशी चुकीची माहीती आरोग्य विभागाने दिली असून याबाबत कोणतीही जबाबदारी स्विकारण्यास महानगरपालिका तयार नसल्याचा आरोप सोलापूर येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहरातील वाढत्या डेंगयुच्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

• सोलापूर शहरात माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये ३५२ संशयीत डेंग्यू रुग्ण आढळले असून त्यापैकी १५१ रुग्ण डेंग्यू पॉझिटीव्ह आढळून आले. सदरचे सर्व रुग्ण हॉस्पिटलमधून बरे झाले आहेत. त्यामध्ये कोणताही रुग्ण डेंग्यू आजाराने मृत्यू झाला असल्याचे प्रयोग शाळेकडील अहवालावरून दिसून आलेले नाही.

(३) व (४) दि.०६.११.२०१७ रोजी मा. पालकमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये देलेल्या सूचनेनुसार डेंग्यु बाधीत भागातील कंटेनर सर्व्हेसाठी अधिकचे ३० एम.पी.डब्ल्यू. नेमण्यात आले असून त्यांच्यामार्फत प्रत्येक घरोघरी भेटी देऊन पाणीसाठे तपासण्यात आले. तसेच दुषित पाणीसाठे नष्ट करण्यात आले. जे पाणी साठे नष्ट करण्याजोगे नाहीत. त्यामध्ये टेमिफॉसचे द्रावण टाकण्यात आले. त्यानुसार नोव्हेंबर, २०१७ पासून डिसेंबर अखेर पर्यंत ८६,५५२ घरांचा कंटेनर सर्व्हे पूर्ण झाला आहे.

• डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनपाकडून विशेष मोहिम घेऊन डेंग्यू प्रभावित ठिकाणी फवारणी व धुवारणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. तसेच यासाठी जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

• सिव्हील हॉस्पिटलशी संपर्क साधून तेथे भरती होणाऱ्या रूग्णांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्याबाबत शहरातील वैद्यकिय महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या टेंडर प्रक्रियेमध्ये पदाचा व पासवर्डचा गैरवापर करुन ठेकेदारांशी संगनमत करणा-या अभियत्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) १०१७४३ (१२-०२-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या टेंडर प्रक्रियेमध्ये पदाचा व पासवर्डचा गैरवापर करुन ठेकेदारांशी अभियंत्यांनी संगनमत केल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुंबई महानगरपालिकेच्या टेंडर प्रक्रियेमध्ये पदाचा व पासवर्डचा गैरवापर करुन ठेकेदारांशी संगनमत करणा-या किती अभियत्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खात्यांतर्गत चौकशी पूर्ण करण्यात आली असून चौकशी अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## वाशिम जिल्हयातील रिसोड (जि.वाशिम) येथील एकविरा व शुभश्री या विकासकांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) १०२१६१ (०३-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील रिसोड (जि.वाशिम) येथील एकविरा व शुभश्री या विकासकांनी साई ग्रीन पार्क, गजानन महाराज रोड, गंगा माँ विद्यामंदिर मागील रो-हाऊसधारकांना आश्वासन देऊनही रस्ते,विद्युत खांब, सांडपाण्याची व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळण्यासाठी जागा, मंदिराची आरक्षित जागा पुरविलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात सांडपाण्याचे डबके साचत असून तेथे डासांची पैदास व डुकरांचा वावर होत असल्यामुळे येथील नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर विकासकाकडून येथील नागरिकांना सुविधा पुरविण्याबाबत तसेच सदर विकासकाने रहिवाशांची फसवणूक केल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यस, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
• विषयांकीत अभिन्यासामध्ये रस्ते, विद्युत व्यवस्था, सांडपाण्याची व्यवस्था ठेवणे आवश्यक असते. तसेच अभिन्यासाच्या क्षेत्रापैकी १० टक्के खुली जागा सार्वजनिक वापरासाठी ठेवणे आवश्यक आहे. तथापि मुलांसाठी खेळण्याची जागा, मंदिराची आरक्षित जागा अशी कोणतीही तरतुद अभिन्यासात केली जात नाही.
• सदर अभिन्यासामध्ये दि.११.०५.२०१८ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता संपूर्ण अभिन्यासामध्ये रस्ते केल्याचे तसेच सांडपाण्याची व्यवस्था केल्याचे आढळून आले नाही.

तथापि काही प्रमाणात रस्त्याचे खडीकरण / बी.बी.एम. करण्यात आल्याचे तसेच काही ठिकाणी विद्युत खांब उभे केले असल्याचे आढळून आले आहे.

(२) दि.११.०५.२०१८ रोजी प्रत्यक्ष जागेच्या स्थळ निरिक्षणा वेळी जागेवर सांडपाण्याचे डपके साचल्याचे अथवा तेथे डुकरांचा वावर होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही, असे नगरपरिषद रिसोड यांनी कळविले आहे.

(३) उक्त प्रकरणी न.प.रिसोड यांनी विकासकाला संबंधित क्षेत्रास भौतिक सुविधा पुरविण्याबाबत नोटीस दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) शहरातील महानंदा नगरी कॉलनीमधील नालीचे बांधकाम निकृष्ट झाले असल्याबाबत**

**(१८) १०२८३८ (०३-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) शहरातील महानंदा नगरी कॉलनीमधील नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने बांधण्यात आलेल्या नालीचे बांधकाम निकृष्ट झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट नालीमुळे सांडपाण्याचा निचरा होत नसून या परिसरात दुर्गंधी पसरुन व डासांचा प्रार्दूभाव होऊन येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील सांडपाण्याचा निचरा योग्यरितीने व्हावा यासाठी सदर नाल्याच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) व (२) अशा आशयाची तक्रार नगरपरिषदेस प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(३) रिसोड नगरपरिषद हद्दीतील महानंदा कॉलनी नगरी मधील सन २०१३-१४ मध्ये झालेले नालीचे बांधकाम सुस्थितीत असुन केवळ तेथील घरांचे नालीमध्ये सोडलेले आऊटलेट व नालीचा तळ यांच्या उंचीमध्ये तफावत असल्याने सांडपाण्याचा निचरा होण्यास अडचण निर्माण झाली असल्याचे नगरपरिषद, रिसोड यांनी कळविले आहे. याबाबत नाला खोलीकरण करून पाण्याच्या निचऱ्याबाबत व्यवस्था करण्यात येईल, असे नगरपरिषद रिसोड यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गोखिवरे (ता.वसई, जि.पालघर) मिठागराच्या मालकी जागेवर विकासकांनी अतिक्रमण करुन रस्ता केल्याबाबत**

**(१९) १०२८७९ (०१-०१-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाव मौजे गोखिवरे (ता.वसई, जि.पालघर) सर्व्हे नं. ९०/१ ९/१२ हिस्सा नं. ३ ते ५ व ७ या मिठागराच्या मालकी जागेवर राकेशकुमार व इतर विकासकांनी अतिक्रमण करुन रस्ता केल्याबाबत माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने या प्रकरणातील विकासकांवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) मौजे-गोखिवरे येथील स.क्र. ९० ही मिळकत खाजगी मालकीची असून सदर जागेवर तत्कालीन नियोजन प्राधिकरण सिडको आणि वसई विरार शहर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच स.क्र.९ ही मिळकत उप प्रदेशाच्या मंजूर आराखड्यानुसार रहिवाशी क्षेत्रामध्ये आहे. सदर मिळकतीवर तत्कालीन नियोजन प्राधिकरण सिडको आणि वसई विरार शहर महानगरपालिकेने कोणतीही बांधकाम परवानगी दिलेली नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच मौजे गोखिवरे स.क्र. ९ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यानुसार सदर मिळकत खाजगी आणि सरकारी (भारतीय रेल्वे) असल्याचे दिसून येत असल्याचे व स.क्र. ९ चे एकूण १९ हिस्सा क्रमांक असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच उपलब्ध ७/१२ उताऱ्यानुसार तक्रारीमध्ये नमुद स.क्र. ९/१२ हि.नं.३ ते ५ व ७ हे नंबर अस्तित्वात असल्याचे दिसून येत नसल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

याप्रकरणी सर्वे क्र. ९/१२ हिस्सा नं.३ ते ५ व ७ च्या सत्यतेविषयी शहानिशा जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून करण्याबाबत तसेच सदर सर्वे नंबर मधील रेल्वेच्या अखत्यारितील जागेत अनधिकृत बांधकामे झाले असल्यास आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती रेल्वे यांना करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे अग्निशमन दलातील आठ जणांना नियमात शिथिलता दिल्याबाबत**

**(२०) १०४९३० (१८-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे अग्निशमन दलातील सर्वोच्च अशा विभागीय अग्निशमन अधिकारी अभ्यासक्रमासाठी अपात्र ठरल्याचा अभिप्राय नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजने देऊनही त्यांच्यासाठी नियम अनियमितपणे शिथिल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान उघड झाला असल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय अधिकारी आणि सहायक विभागीय अधिकाऱ्यांच्या मिळून तीन जागा रिक्त असताना अग्निशमन दलाने आठ अधिकाऱ्यांना या अभ्यासक्रमासाठी पाठविले असून यातील दोन अधिकाऱ्यांनी सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे अग्निशमन दलातील प्रभाकर उम्राटकर, राजेश जगताप, समीर शेख, शिवाजी मेमाणे, संजय रामटेके, प्रकाश मोरे आणि प्रमोद सोनावणे या अधिकाऱ्यांची नावे विभागीय अग्निशमन अधिकारी (डिव्हिजनल ऑफिसर) अभ्यासक्रमासाठी निश्चित करण्यात आली ही नावे नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेजने'अपात्र'केली असतांना डिव्हिजनल ऑफिसर पदासाठी जड वाहन चालविण्याचा परवाना व २ वर्षांचा अनुभव आवश्यक असतांना पुणे अग्निशमन दलाने या अटी राज्य अग्निशमन संचालनालयाकडून शिथिल करून या अधिकाऱ्यांची अभ्यासक्रमासाठी निवड केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे अग्निशमक दलातील आठ जणांना नियमात शिथिलता देऊन थेट डिव्हिजल ऑफिसर पदाच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याच्या गंभीर प्रकरणी शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिका सेवा व सेवांचे वर्गीकरण नियम २०१४ मधील तरतुदींनुसार सदर नियमांना शिथिलता देण्याबाबत पुणे महानगरपलिकेने संचालक,महाराष्ट्र अग्निशमन संचालनालय, यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता.

संचालकांनी दिलेले मान्यतेनुसार पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडील अधिकाऱ्यांना नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज, नागपूर यांच्याकडील विभागीय अग्निशमन अधिकारी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वेळी २ अधिकारी किंवा कॉलेज प्रवेश देईल त्यानुसार पाठविण्यात येत आहे.

सदरील सर्व अधिकाऱ्यांकडे जड वाहन चालविण्याचा परवाना आहे. जरी खात्याकडे विभागीय अग्निशमन अधिकारी आणि सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकाऱ्यांच्या मिळून तीन जागा रिक्त असल्या तरी अधिकाऱ्यांना अग्निशमन व बचाव कार्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक असल्यामुळे खात्याकडील अधिकाऱ्यांना सदर प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड पश्चिमेला (मुंबई) कचऱ्याच्या नावाखाली खारफुटीची कत्तल होत असल्याबाबत

**(२१) १०५११६ (१८-०४-२०१८). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिम (मुंबई) येथे मीठ चौकीजवळ वसलेल्या गणेश नगर भागात रोज रात्री कचरा जाळण्याचे काम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील खारफुटीही जाळून नष्ट करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरातील हवेची गुणवत्ता अनेकदा वाईट ते अतिशय वाईट दर्जाची होत असून याबाबत वारंवार तक्रार करूनही याकडे महानगरपालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे कचऱ्याच्या नावाखाली खारफुटीची कत्तल करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) मालाड पश्चिम येथील गणेशनगर भागातील झोपडयांमध्ये काही ठिकाणी तांब्याच्या वायर जाळून तांबे वेगळे करण्याचे काम सुरु होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर ठिकाणी खारफुटी नाही.

(३) व (४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-

- सदर ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
- तांब्याच्या वायर जाळण्याचे प्रकार होत असलेल्या झोपडया तोडण्यात आल्या आहेत.
- सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी आयझॉल या जंतुनाशकाचा अतिवापर होत असल्याबाबत**

**(२२) १०५२५० (१८-०४-२०१८). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सी विभाग कार्यालयाच्या हद्दीतील परिसरामध्ये आयझॉल या जंतुनाशकाच्या फवारणीमुळे रस्ते लालभडक दिसु लागल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनांच्या रहदारीमुळे सदर रस्त्यावरील धूळीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही स्वच्छता मोहीम स्वच्छ भारत अभियानांतर्गत करण्यात आलेल्या स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या केंद्रीय अधिकारी यांच्यासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या स्वच्छता मोहीमेला त्वरित थांबविण्यासाठी शासन महानगरपालिकेला निर्देश देणार काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत परिसरात दुर्गंधी व रोगराई पसरु नये याकरिता आयझॉल या पांढऱ्या/लाल रंगाच्या जंतुनाशक पावडरचा वापर नियमितपणे करण्यात येतो.

परंतु त्यामुळे रस्ते लालभडक दिसत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, "रस्त्यांवर स्वच्छतेची लाली" अशा आशयाची बातमी दिनांक १८.०१.२०१८ रोजीच्या लोकसत्ता वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर जंतुनाशक पावडरच्या जंतुशमन क्षमतेच्या योग्य त्या तपासण्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत करण्यात आल्या असून, सदर तपासणीत जंतुनाशक पावडरची जंतुशमन क्षमता नियमानुसार आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालानुसार सदर परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात नसल्याचे दिसून आले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागामध्ये नियमितपणे करण्यात येत असलेल्या स्वच्छतेच्या कामाकरिता आयझॉल या जंतुनाशक पावडरची फवारणी करण्यात येते.

त्यामुळे स्वच्छता मोहिमेंतर्गत स्वच्छतेची पाहणी करण्यासाठी येणाऱ्या केंद्रीय अधिकारी यांच्यासाठी सदर जंतुनाशकाची फवारणी करण्यात आली ही बाब खरी नाही.

**मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या अन्यायामुळे कंत्राटी महिला सफाई कामगार यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(२३) १०५३०९ (१९-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या अन्यायामुळे अंधेरी के पश्चिम विभागात काम करणाऱ्या कंत्राटी महिला सफाई कामगार सुमती देवेंद्र यांनी आत्महत्या केल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कचरा वाहतुकीच्या कामगारांनी सुमती यांचा मृतदेह महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात आणून ठिय्या आंदोलन केल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागात कंत्राटी तत्वावर कार्यरत असणाऱ्या सफाई कामगार श्रीमती सुमती देवेंद्र यांचा दिनांक ०२.०१.२०१८ रोजी मृत्यु झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने कचरा वाहतुक श्रमिक संघटनेच्या ६०% कामगारांना अशासकीय संस्थांमार्फत सफाईचे काम देण्याबाबत आदेश दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सफाई कामाकरीता अशासकीय संस्थांची निविदा प्रक्रियेद्वारे ६ महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात येते व सदर संस्थांमार्फत कंत्राटी सफाई कामगार पुरविण्यात येतात.

सदर सफाई कामगारांना अशासकीय संस्थांमार्फत वेतन अदा करण्यात येते व अशासकीय संस्थांनी सफाई कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा केल्याची खातरजमा केल्यानंतर त्याची प्रतिपूर्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

श्रीमती सुमती देवेंद्र या दिनांक १ जून, २०१७ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत "प्रियांका बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित" या अशासकीय संस्थेकडे व दिनांक ०१.१२.२०१७ ते ०१.०१.२०१८ या कालावधीत "नगर ग्रामविकास मंडळ" या अशासकीय संस्थेकडे कामावर होत्या.

त्यांनी केलेल्या कामाचे मागील ६ महिन्यांचे वेतन त्यांना अशासकीय संस्थांमार्फत अदा केल्याचे बँकेच्या विवरणपत्रावरुन दिसून येते.

त्यामुळे श्रीमती सुमती देवेंद्र यांना काम देण्यास नकार दिला अशी वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकांतर्गत १४०० मोठ्या इमारतींना आगीपासून धोका असल्याबाबत**

**(२४) १०५३६६ (१९-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकांतर्गत १४०० मोठ्या इमारतींना आगीपासून धोका असल्याचे वृत्त दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींमधील बहुतांश इमारती या रेसीडेशीयल (निवासी) हॉटेल म्हणून अस्तित्वात असून या हॉटेलमध्ये कोणतीही सुरक्षा यंत्रणा नसतांनाही हे सर्व हॉटेल अद्याप सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १४०० मोठ्या इमारतींमध्ये नागपूर शहरातील नामवंत हॉटेल्स, मंगल कार्यालये व नामवंत उंचीवरील हॉटेल यांचा समावेश असून यांचा एकूण परिसर १५० चौ.मी.असतानाही यांनी फायरचे प्रमाणपत्र घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सर्व इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सरंक्षक अधिनियमांतर्गत सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशांसह महानगरपालिकेकडे उंचीवरील हॉटेल वा इमारतींवर आग नियंत्रण प्रणाली अस्तित्वात आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय, असे वृत्त प्रसिध्द झाले होते.

(२) हे खरे नाही.

(३) शहरातील १४०० इमारतींपैकी ६३४ इमारतधारकांनी अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र घेतले असून, इतर इमारतधारकांनी प्रथम ना-हरकत घेतलेले आहे.

(४) व (५) नागपूर महानगरपालिकेकडे, वेगवेगळ्या क्षमतेची २४ वाहने, ४२ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर, १५ मीटर हायड्रोलीक प्लॅटफार्म उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे विभागाने स्वयंचलीत अग्निशमन प्रणाली यंत्रप्रणाली स्थापीत केलेली आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकामांना अभय मिळवून देणा-या पालिका अधिका-यांची गुप्तचर विभागामार्फत चौकशी करण्याबाबत

**(२५) १०५४९७ (१९-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील अधिका-यांना हाताशी धरून अनधिकृत बांधकामे स्वतः करणाऱ्या आणि इतरांच्या अनधिकृत बांधकामांना अभय मिळवून देणा-या सखाराम शंकर खोपडे उर्फ बालाशेठवर व त्यांस अभय देणा-या पालिका अधिका-यांची गुप्तचर विभागामार्फत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी लोअर परळ रहिवाशी मंडळाने एका लेखी निवेदनांद्वारे सन २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय तसेच आयुक्त, मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशी नुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) लोअर परेल, मुंबई या विभागातील अनधिकृत बांधकामासाठी नामचीन असलेले नेते श्री.सखाराम शंकर खोपडे (बाळा शेठ) यांनी उर्मी इस्टेटमध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामापासून होणाऱ्या नाहक त्रासाबाबत या विषयाबाबत लोअर परेल रहिवाशी मंडळ यांनी दिनांक ०१.०१.२०१८ रोजी केलेल्या तक्रारी नगर विकास विभागास प्राप्त झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर तक्रारी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठविण्यात आल्या आहेत.

तसेच, सदर तक्रारींमध्ये नमूद विषयाच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करुन चौकशीचा अहवाल शासनास उलटटपाली पाठविण्याच्या सूचना दिनांक २८.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

---

## नागपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतींमधील अग्निशमन यंत्रांचे निरिक्षण करण्यात येणार असल्याबाबत

**(२६) १०७९७० (१८-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतींमधील अग्निशमन यंत्रांचे निरिक्षण करण्यात येणार असून त्या निरिक्षणात कायद्याचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास कारवाई केली जाणार असल्याची माहिती नागपूर मनपाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन यंत्रणांचे निरिक्षण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, किती इमारतींनी अग्निशमन यंत्रणा बसविली व किती इमारतींनी कायद्यांचे उल्लंघन केले आहे,
(४) असल्यास, सदर निरिक्षणात कायद्यांचे उल्लंघन केलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) • न्याय मंदिर, सुयोग इमारतीतील न्यायालय व जुने जिल्हा न्यायालय या इमारतींची अग्नि व जीवसुरक्षेच्या दृष्टीने तपासणी (Fire Audit) करुन दिनांक २६/११/२०१५ रोजी इमारतीत आवश्यक असलेल्या अग्निशमन उपाययोजना व यंत्रणा लावण्याबाबत सूचनापत्र निर्गमित करण्यात आले होते.
• त्यानुसार, या इमारतीच्या प्रत्येक माळ्यावर पर्याप्त प्रथमोपचार अग्निशमन यंत्रे (एकूण ३१६) बसविण्यात आलेली असून, ती कार्यक्षम स्थितीत आहेत. तसेच आणिबाणीच्या प्रसंगी इमारतीतून सुखरुपपणे बाहेर पडण्याकरिता एकूण ६ जीने उपलब्ध आहेत.
• याशिवाय अग्निशमन विभागाच्या सूचनेनुसार, या इमारतीमध्ये इतर आवश्यक अग्निशमन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेमार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केडीएमसी मधील अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांचे करण्यात आलेले निलंबन वा बदली याचे पालन करण्यात येत नसल्याबाबत

**(२७) १०८१६१ (१८-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केडीएमसीचे वादग्रस्त कर निर्धारक व संकलक अनिल लाड यांना निलंबीत करण्यात आल्याची घोषणा विधीमंडळात नगरविकास राज्यमंत्री यांनी केल्यानंतरही अद्यापी केडीएमसीचे आयुक्त वेलरासू यांनी श्री.अनिल लाड यांच्या निलंबनाची कारवाई पूर्ण केली नसल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवृत्त सहसचिव ल.रा.खूपराव समितीने अनिल लाड यांना दोषी ठरविल्यानंतर तत्कालीन सभापतींनी लाड यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देऊनही तत्कालीन महानगरपालिका आयुक्त ई रविंद्रन यांना कारवाई न केल्याने अनिल लाड महानगरपालिका सेवेत कार्यरत असणे, सभापतींनी आदेश देऊनही त्याची पुर्तता न करणाऱ्या तत्कालीन महानगरपालिका आयुक्त ई रविंद्रन यांनी हेतूत: कारवाईस केलेला विलंब व शासनाच्या आदेशाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत दोषी ठरवून ई रविंद्रन यांचेकडे स्पष्टीकरण मागण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, केडीएमसीचे उपायुक्त धनाजी तोरस्कर यांची बदली गडचिरोली येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी या पदावर करुन तातडीने तेथे रुजू होण्याचे आदेश देऊनही धनाजी तोरस्कर हे अद्यापी बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्याची बाब निदर्शनास येऊनही शासनाच्या नवीन नियमानुसार धनाजी तोरस्कर यांचेविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, केडीएमसी मधील अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांचे करण्यात आलेले निलंबन वा बदली याचे पालन करण्यात न येणे, परंतु कनिष्ठ अधिकाऱ्यांना शासन नियमानुसार शिक्षा करुन त्याचे तातडीने करण्यात येणारे पालन हा शासकीय सेवेतील हेतूत: करण्यात येणारा भेदभाव जाणूनबुजून करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यस, तोरस्कर व अनिल लाड यांच्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे पालन तातडीने न करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यां विरोधात कारवाईस हेतूत: विलंब केल्याबद्दल काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) व (२) • विभागीय चौकशीत दोषी आढळून आलेले कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे श्री. अनिल लाड, कर निर्धारक व कर संकलक यांना सेवेतून निलंबित करण्याची घोषणा मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांनी विधीमंडळाच्या २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात केली होती.

• त्यानुसार श्री.लाड प्रभाग क्षेत्र अधिकारी/ सहायक आयुक्त यांना दि.१२.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये महापालिका सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(३) • श्री.धनाजी तोरस्कर, उप आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या बदलीचे बदलीचे आदेश दि.०५.०२.२०१८ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत.

• श्री.तोरस्कर यांचे जागी अद्याप पर्यायी अधिकारी उपलब्ध झालेला नाही. तथापि त्यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून कार्यमुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे श्री.अनिल लाड, कर निर्धारक व कर संकलक यांना दि.०८.०२.२०१८ च्या आदेशान्वये महापालिका सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

•महानगरपालिकेच्या वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांबाबत शिस्तभंगविषयक कारवाई करताना भेदभाव केला जातो अशी वस्तुस्थिती नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर (जि.नागपूर) शहरात अग्निशामक केंद्राची कमतरता असल्याबाबत**

**(२८) १०८८३९ (१२-०४-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) शहरात वाढती लोकसंख्या व एकंदरीत शहराचा विस्तार पाहता याठिकाणी अग्निशामक केंद्राची कमतरता असल्याची बाब निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ नवीन अग्निशामक केंद्रांचा तसेच नविन ८५२ पदांचा प्रस्ताव तयार असुन त्याची आवश्यकता असल्याची बाब निर्दशनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर विभागात नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरिता दोनच अधिकारी कार्यरत असून अधिकाऱ्याची गरज असल्याची बाब निर्दशनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) याअनुषंगाने, टप्प्याटप्प्याने पद भरती करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

## पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या भामा आसखेड प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(२९) १०९०१९ (१९-०४-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भामा आसखेड प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु आहे याबाबत संबंधित विभाग व कंत्राटदार आणि लोकप्रतिनिधींची वारंवार बैठक होऊनसुद्धा याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंत्राटदारावर काम वेळेत पूर्ण न केल्यामुळे शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१), (२) व (३) • केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएच योजनेंतर्गत पुणे शहरास भामा-आसखेड धरणातून पाणी पुरवठा करण्याच्या रु.३८०.०० कोटीच्या प्रकल्पास सन २०१३ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.
• भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांकडून काम बंद पाडले जात असल्याने प्रकल्पाच्या काही उपांगांची कामे बंद असल्याचा अहवाल पुणे महानगरपालिकेने सादर केला आहे.
• प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांकडून काम बंद पाडले जात असल्याने प्रकल्पाच्या कामास विलंब होत असल्याचा अहवाल पुणे महानगरपालिकेने सादर केला आहे.

• सदर मागण्यांबाबत तोडगा काढण्याच्या अनुषंगाने विविध स्तरावर बैठका घेऊन आवश्यक कार्यवाही पुणे महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

---

**अकोला महानगरपालिका कर्मचा-यांच्या जीपीएफ फंडाची रक्कम महानगरपालिका फंडात मुख्य लेखा परिक्षक तथा उपायुक्त यांनी वळती केल्याबाबत**

**(३०) १०९४६८ (१८-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका कर्मचा-यांच्या जीपीएफ फंडाची रक्कम महानगरपालिका फंडात मुख्य लेखा परिक्षक तथा उपायुक्त यांनी वळती केल्याची तक्रार अकोला म्युनिसिपल मजदूर युनियनने आयुक्तांकडे केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय. अशी तक्रार अकोला महानगरपालिकेकडे दिनांक २७/१२/२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणात तक्रार अर्जात नमूद १७ कर्मचा-यांनी केलेल्या केलेल्या विनंतीनुसार, त्यांच्या थकीत ६ व्या वेतन आयोगाच्या रकमा, रितसर मान्यता घेऊन भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा केलेल्या होत्या.

परंतु त्यानंतर याबाबत महासभेमध्ये उपस्थित सदस्यांकडून याप्रकरणी आक्षेप नोंदविण्यात आल्यामुळे, सदरच्या रकमा दिनांक ०७/११/२०१७ रोजी महानगरपालिकेच्या निधीत जमा केलेल्या आहेत.

महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात जसजसी वाढ होईल, त्यानुसार टप्प्याटप्प्याने अशा थकीत रकमा देण्याचे प्रशासकीय पातळीवर निश्चीत करण्यात आलेले आहे.

असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**पुणे महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी सेवकांसाठी बांधण्यात आलेल्या पुर्नवसित इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) १०९९०० (१८-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी सेवकांसाठी गंज पेठ येथील लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नगर महानगरपालिका कॉलनी नं.-६ बी.ओ.टी. तत्वावर बांधण्यात आलेल्या पुर्नवसित इमारतीची दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार सदर पुर्नवसित इमारतींच्या दुरूस्ती व देखभाल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) व (२) सदर ठिकाणी वेळोवेळी करण्यात येणाऱ्या जागापाहणीमध्ये ड्रेनेजचे डाउनटेक पाईपची मोडतोड झाल्याचे निदर्शनास आली होती. त्यामुळे पाणी वाहून पार्किंग मध्ये साठले होते. ही वस्तुस्थिती आहे.

सदर ठिकाणच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांबाबत पुणे महानगरपालिकेतील क्षेत्रीय कार्यालयांना कळविले आहे. त्यांच्याकडून दुरुस्तीची कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) नगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३२) १०९९१३ (१९-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण नगरपालिकेच्या (जि.सिंधुदुर्ग) माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या भुयारी गटार योजनेच्या बंद पडलेल्या उर्वरित कामासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत ३ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर करुन सिंधुदुर्ग जिल्हाधिका-यांकडे वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपालिकेच्या या भुयारी गटार योजनेच्या पूर्वीच्या कामात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीही नगरपालिका प्रशासन व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे ग्रामस्थांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भुयारी गटार योजनेच्या उर्वरित काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे व तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या गैरव्यवहारातील जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) • केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम अभियानातील युआडीएसएसएमटी या उपअभियानांतर्गत मालवण शहराकरिता रु.१८.८४ कोटी निधीचा भुयारी प्रकल्प मंजूर आहे.

• सदर प्रकल्पातील उर्वरित कामांसह राज्य शासनाच्या वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत गॅप फडींग म्हणून रु.३.०० कोटी निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वर्ग करण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(२) • जेएनएनयुआरएम योजनेच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पांतर्गत पूर्ण झालेल्या कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करण्यात आली आहे.

• तसेच प्रकल्पाची कामे सुरु असताना प्रकल्पाचे साहित्य, वाहतुक व रस्ता पुर्ववत करण्याच्या अनुषंगाने नागरिकांकडून नगरपरिषदेस तक्रारी प्राप्त झाल्याचा अहवाल मुख्याधिकारी, मालवण नगरपरिषद व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी सादर केला आहे.

(३) व (४) • त्रयस्थ संस्थेकडून तपासणीमध्ये कोणत्याही त्रुटी अथवा तांत्रिक अनियमितता आढळून आली नसल्याचे मालवण नगरपरिषदेने कळविले आहे.

• नागरिकांकडून प्राप्त तक्रारींचे निरसन नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आल्याचा अहवाल मुख्याधिकारी, मालवण नगरपरिषद व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी सादर केला आहे.

• प्रकल्पासाठी आवश्यक असलेला केंद्र व राज्य शासनाचा संपूर्ण हिस्सा नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला असून माहे जून, २०१८ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येईल, असे मालवण नगरपरिषदेने कळविले आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांर्गत कल्याण रेल्वेस्थानक परिसराचा विकास करण्याकरिता राज्य परिवहन विभागाने अद्यापही सहमती दिली नसल्याबाबत**

**(३३) ११०१५९ (१८-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांर्गत कल्याण रेल्वेस्थानक परिसराचा विकास करण्याकरिता राज्य परिवहन विभागाने अद्यापही सहमती दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन विभागाने सहमती न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकल्पाला तातडीने परिवहन विभागाची सहमती देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही .

• कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत कल्याण रेल्वेस्थानक परिसराचा विकास करण्याकरिता राज्य परिवहन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे .

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) मधील रुग्णालयांची नोंदणी व नुतनीकरण शुल्क वाढविण्याच्या प्रस्तावावर फेरविचार करण्याकरिता उपसमिती नेमण्याबाबत**

**(३४) ११०१६१ (१२-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) मधील रुग्णालयांची नोंदणी व नुतनीकरण शुल्क वाढविण्याच्या प्रस्तावावर फेरविचार करण्याकरिता उपसमिती माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसमितीने आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर उपसमितीच्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) व (२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दि. १८.११.२०१७ च्या गोषवाऱ्यानुसार बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ अंतर्गत नोंदणी/ नुतनीकरणासाठी नवीन दराने नोंदणी शुल्क आकारणेस मंजूरी देणेबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०८, दि. १५.१२.२०१७ अन्वये तदर्थ समिती नियुक्त केलेली आहे.

• सदर समितीने दि. ०८.०१.२०१८ रोजी बैठक घेऊन रूग्णालयाच्या नोंदणी व नुतनीकरण शुल्क वाढविण्यासंदर्भात सर्वसाधारण सभेस मंजूरीची शिफारस केली आहे.

(३) तदर्थ समितीने सन २०१८-१९ पासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात खाजगी व धर्मादाय रूग्णालयांची नोंदणी व नुतनीकरण करण्यात येणाऱ्या रूग्णालयांकडून नोंदणी व नुतनीकरण शुल्कात वाढीची शिफारस केलेली असून त्यानुसार महासभेत ठराव मंजूर करून नव्या दराने रूग्णालय नोंदणी व नुतनीकरण आकारण्यात यावी याबाबत अभिप्राय दिले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीसह २७ गावांतील बेकायदा बांधकामे जमिनदोस्त करण्याबाबत**

**(३५) ११०१८९ (०३-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीसह २७ गावांत बेकायदा इमारती, चाळी उभारणा-या भूमाफियांची बांधकामे निश्चित करुन ती बांधकामे जमिनदोस्त करण्याचे आदेश आयुक्तांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार आतापर्यंत किती बेकायदा बांधकामांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बेकायदा बांधकाम करणा-या विकासकांवर व त्यास परवानगी देणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) • आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या आदेशानुसार प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत एकुण ३०९ बेकायदा बांधकामे व १३९ जोत्यांच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

• महानगरपालिका हद्दीमध्ये होणारे अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत नियमित कारवाई करण्यात येते.

(३) बेकायदा बांधकामे करणाऱ्या विकासकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे-भिवंडी-कल्याणपर्यंत येणा-या मेट्रो रेल्वेचा मार्ग खडकपाडा, बिर्ला कॉलेजमार्गे नेण्याबाबत करण्यात आलेल्या मागणीबाबत**

**(३६) ११०५०४ (१८-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-भिवंडी-कल्याणपर्यंत येणा-या मेट्रो रेल्वेचा मार्ग खडकपाडा, बिर्ला कॉलेजमार्गे नेण्याची करण्यात आलेली मागणी एमएमआरडीएने फेटाळल्याने तेथील स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पश्चिमेतील नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या मार्गावरुन मेट्रो नेण्यास एमएमआरडीएने नकार दिल्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :**(१), (२), (३) व (४) प्रस्तावित मेट्रो मार्गात लाल चौकी, कल्याण मेट्रो आणि APMC कल्याण अशी तीन महत्वपूर्ण मेट्रो स्थानके प्रस्तावित असून सदर स्थानके ही कल्याण पश्चिम परिसरास योग्य पद्धतीने बससेवा, रिक्षा/टॅक्सी इत्यादी सेवेने जोडावयाचे असून सदर परिसरातील नागरीक सहज आणि योग्य पद्धतीने मेट्रो स्थानकापर्यंत पोहचू शकतील. सदर मेट्रो प्रकल्प अहवालास दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या कामासाठी निविदा दस्ताऐवज तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ढाणकी ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत**

**(३७) ११०५२९ (१८-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ढाणकी ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजीच्या सुमारास नगरविकास विभाग, मंत्रालय यांनी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाला शासनाने मान्यता दिली आहे काय, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) यवतमाळ जिल्हयातील तालुका उमरखेडमधील ढाणकी या ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडून शासनास प्राप्त झाला असून प्रस्ताव मा.मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**कल्याण (जि.ठाणे) शहरात अनधिकृत बांधकामाविरोधात एमआरटीपी कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत**

**(३८) ११०९१३ (११-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहरात अनधिकृत बांधकामाविरोधात एमआरटीपी कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी प्रभागक्षेत्र अधिकारी व नगररचनाकार यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार आतापर्यंत किती अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) • आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या आदेशानुसार प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत एकुण ३०९ बेकायदा बांधकामे व १३९ जोत्यांच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

• महानगरपालिका हद्दीमध्ये होणारे अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत नियमित कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या चतुर्श्रुंगी पाणीपुरवठा विभागाने औंध सर्वे नं.८६ येथील जागेवर टाकी बांधण्याबाबतचा प्रस्ताव

**(३९) १११६४८ (०३-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील औंध, पाषाण, खडकी, राजभवन, इंदिरानगर, कस्तुरबा वसाहत व चव्हाण नगर परिसरातील सुमारे ५ लाख नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेच्या चतुर्श्रुंगी पाणीपुरवठा विभागाने औंध सर्वे नं.८६ येथील जागेवर टाकी बांधण्याबाबत प्रस्ताव सादर केला असून सदर जागा पोलीस बिनतारी विभागाच्या ताब्यातील असल्याने विभागाने ना हरकत प्रमाणपत्र न दिल्याने सदर टाकीचे बांधकाम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस बिनतारी संदेश विभागाच्या वतीने सदर ५.२१ एकर क्षेत्रफळाची मोकळ्या जागेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यातील पर्यायी जागा देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या आयुक्ताने दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१६ रोजी औंध येथील सर्वे नं.८६ येथील पोलीस बिनतारी विभागाच्या जागेच्या बदल्यात बाणेर, बालेवाडी, पाषाण व बावधन येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील (ॲमिनिटी स्पेस) मोकळ्या जागा हस्तांतरित करण्याबाबत तत्वता: मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औंधच्या सर्वे नं. ८६ च्या जागेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या वतीने पाषाण, बाणेर, बावधन व बालेवाडी परिसरातील एकूण २०९७७.१७ चौरस फुटाची मोकळी जागा हस्तांतरित करण्यात अप्पर पोलीस महासंचालक, पोलिस बिनतारी संदेश विभागाने दिनांक २० जानेवारी, २०१७ च्या पत्राने मान्यता देऊन जागेचा ताबा देण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर जागा महानगरपालिकेकडून हस्तांतरित करण्यास विलंब झाल्याने, टाकीचे बांधकाम न झाल्याने परिसरातील ५ लाख नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, गृहराज्यमंत्री (शहर), मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करून पाण्याची टाकी बांधण्याकरिता जागा हस्तांतरित करण्याबाबत मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर जागा हस्तांतरित करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार वा करित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) हे खरे आहे,
(४) होय, अंशत: खरे आहे.

परंतु, पोलीस बिनतारी संदेश विभागाने पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित करावयाचे क्षेत्र १८५६१ चौ.मी. इतकेच आहे.

(५) व (६) अंशत: खरे आहे.
(७) या प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सर्व संबंधीतांसमवेत बैठक झाली असून त्यास अनुषंगाने बैठकीतील निर्देश संबंधीतानां इतिवृत्ताव्दारे कळविण्यात आले आहेत.

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे पथक पाहणीसाठी गेले असता घर पाडणार या भितीने एका महिलेने आत्महत्या केल्याबाबत**

**(४०) ११२१९७ (१९-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे पथक दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी पिंपळे गुरव परिसरातील एका अनधिकृत बांधकामाची पाहणी करण्यासाठी गेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घर पाडणार या भितीने त्या इमारतीच्या चौथ मजलवरुन उडी मारुन एका महिलेने आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेने परिसरात तणावग्रस्त वातावरण झाले असून मृत महिलेल्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे पिंपळे गुरव परिसरातील अनधिकृत बांधकामावर दि. १६/०१/२०१८ पासून निष्कासनाची कारवाई सुरु करणेत आली होती. दि. १६/०१/२०१८ ते दि. २३/०१/२०१८ पर्यंत अनधिकृत बांधकामे निष्काषीत करणेची कारवाई सलग करणेत आली. यापैकी एका अनधिकृत बांधकामाची पाहणी करणेसाठी अतिक्रमण विभागाचे पथक गेले होते हे खरे आहे.

सदर प्रकरणी घर पाडणार या भितीने इमारतीच्या चौथ्या मजल्यावरुन उडी मारुन महिलेने आत्महत्या केली हे खरे आहे.

सांगवी पोलिस स्टेशन मध्ये सदर महिलेचे विरुध्द सरकारी कामात अडथळा आणून आत्महत्येचा प्रयत्न केले बदल गुन्हा दाखल करणेत आला. व त्याबाबत पोलीसांमार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार क्षेत्रात एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी खोटे काम पडताळणी प्रमाणपत्र देऊन प्राधिकारणाची फसवणूक केल्याबाबत**

**(४१) ११२३२३ (१९-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार क्षेत्रात एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी खोटे काम पडताळणी प्रमाणपत्र देऊन प्राधिकारणाची फसवणूक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियंत्याकडे हजारो कोटींची कामे प्राधिकारणाकडून सोपविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रमाणपत्रावर मुख्य अभियंता, शहरी स्थानिय निकाय निदेशालय, हरियाणा यांनी आक्षेप घेतल्यामुळे त्याबाबतची चौकशी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्राथमिक तपासणीसाठी दि.१६ मे, २०१७ ते दि.२ जानेवारी, २०१८ (७ महिने) अखेर श्री. आनंद कुमार पहल, अति. मुख्य अभियंता आणि श्री. प्रकाश केशवराव वेणी, कार्यकारी अभियंता यांना निलंबित केले होते. प्राधिकरणाने दि.१५/६/२०१७ रोजी चौकशी अधिकारी यांची नेमणूक करुन विभागीय चौकशी केली. सदर प्रकरणी प्राथमिक सुनावणी दि.११/९/२०१७ रोजी घेण्यात आली आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालानुसार श्री. आनंद कुमार पहल, अति. मुख्य अभियंता आणि श्री. प्रकाश केशवराव वेणी, कार्यकारी अभियंता यांचे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३(१) चे पोटकलम (एक) (दोन) (तीन) चे उल्लंघन केल्याचे सिध्द झाले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील ६(२) पोटकलम नियम (१) नुसार शिस्तभंग प्राधिकारी म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने श्री. आनंद कुमार पहल, अति. मुख्य अभियंता यांना अधिक्षक अभियंता या पदावर दि.२ जानेवारी, २०१८ पासून पदावनत केले आहे.

श्री.पहल यांचेकडे निलंबनापूर्वी अति.मुख्य अभियंता या पदाचा स्वतंत्र कार्यभार होता व मागिल वर्षी सुमारे रु. १७६ कोटी खर्चाची कामे स्वतंत्रपणे त्यांचे अधिपत्याखाली होती. पदावनती नंतर श्री. पहल यांना स्वतंत्र कार्यभार देण्यात आलेला नसुन ते मुख्य अभियंता यांचे अधिपत्याखाली सद्यस्थितीत उर्वरीत सुमारे रु. ५० कोटी किंमतीची चालू कामे व इतर प्रस्तावित नियोजन स्तरावरील कामे सोपविण्यात आली आहेत.

---

## भिवंडी तालुका (जि.ठाणे) एमएमआरडीएने मंजूर केलेल्या कामांची आय.आय.टी. विभागामार्फत चौकशी करण्याबाबत

**(४२) ११२३५३ (१२-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुका (जि. ठाणे) येथे एमएमआरडीएकडून सन २०१५-१६ पासून ते आजपर्यंत अनेक महत्वाची रस्ते विकास कामे हाती घेतली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे कार्यारंभ आदेश देऊन २ वर्षे उलटूनही आजपर्यंत पूर्ण करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागातील कामांबाबत एमएमआरडीएचे मुख्य अभियंता (बांधकाम) हे ठराविक कंत्राटदारांना कामे करणेबाबत संधी देण्यात येत असल्यामुळे या विभागातील कामे गतीमान होत नसल्याबाबतचे अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन उक्त प्रकरणी भिवंडीतील एमएमआरडीएने मंजूर केलेल्या कामांची आय.आय.टी. विभागामार्फत चौकशी करुन संबधित दोषींवर कारवाई करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) सन २०१५-२०१६ पासून कार्यारंभ आदेश दिल्यानंतर २ वर्ष उलटलेली ४ कामे आहेत. यापैकी २ कामे विहित कालावधीत पूर्ण झालेली असून उर्वरित दोन कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहेत.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या विविध रुग्णालयांमध्ये होत असलेला गैरकारभार

**(४३) ११२६२४ (१९-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या विविध रुग्णालयांमध्ये विशेषत: डॉ वा.ल. नायर रुग्णालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नाहक त्रास देणे, रुग्णांना अपुरी वैद्यकीय सेवा देणे तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख यांच्या गैरकारभाराबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व नगर विकास विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ या दरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख हे सहकारी अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नाहक त्रास देऊन दमबाजी करुन इतर विभागांच्या कामात ढवळाढवळ करणे, पोस्टमार्टम विभागात गैरप्रकार करणे तसेच महाविद्यालयातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या प्रोफेसर व विभाग प्रमुखांच्या कामात अडचणी निर्माण करुन विद्यार्थ्यांचे करिअर खराब करण्याच्या धमक्या देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख हे डॉ वा.ल. नायर रुग्णालयाचे डिन होण्याकरीता गैरमार्गाने महापालिकेवर दबाब आणत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विविध विभागांचे विभाग प्रमुख विशेषत: न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयात न्यायवैद्यक शास्त्र विभाग प्रमुखाविरुध्द तक्रार प्राप्त झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमळनेर नगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोथान महाभियानांतर्गत भुयारी गटारीचे कामाबाबत

**(४४) ११३२३१ (१८-०४-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये अमळनेर नगरपरिषदेच्या रुपये ६६.७५ कोटींच्या भूयारी गटार योजनेस प्रशासकीय मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपरिषदने कंत्राटदारास नियमबाह्य पध्दतीने पाईपच्या खरेदीपोटी केलेल्या प्रदानाची संपूर्ण वसूली तात्काळ करावी व या योजनेचे काम पूर्ण ठेव तत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे अंमलबजावणीसाठी निधीसह सोपवावे असे आदेश नगरविकास विभागामार्फत दिनांक १५ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमळनेर नगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोथान महाभियानांतर्गत भुयारी गटाराचे काम करण्यास नगरपरिषद सक्षम नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे निधीसह वर्ग करणेबाबत व कार्यवाहीस विलंब करणा-या मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रान्वये केली होती, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास तात्काळ करारनामा करून काम सुरु करण्यास व कार्यवाही करण्याचे आदेश पारित केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी नगरविकास विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) • भुयारी गटार प्रकल्पाचे काम सुरु होण्यापूर्वी अमळनेर नगरपरिषदेने पाईप खरेदीची प्रक्रिया केल्याची अनियमितता झाली असल्याने सदर प्रकल्प निधीसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याबाबत तसेच, प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यास विलंब करणाऱ्या मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधींनी शासनास दिले आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) • अमळनेर भुयारी गटार प्रकल्पाच्या कामाच्या अंमलबजावणीमध्ये झालेले अक्षम्य दुर्लक्ष व शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या अमळनेर नगरपरिषदेच्या संबंधित मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे.
• सदर प्रकल्पाचे काम एप्रिल, २०१८ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.

---

## अग्निशमन दलाकडून मॉल, थिएटर, हॉटेल, रेस्टॉरंट, लॉज, दुकाने आदी व्यावसायिक आस्थापनांच्या दर सहा महिन्यांनी तपासण्या होऊन त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण होण्याबाबत

**(४५) ११३५८९ (१२-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अग्निशमन दलाकडून मॉल, थिएटर, हॉटेल, रेस्टॉरंट, लॉज, दुकाने आदी व्यावसायिक आस्थापनांच्या दर सहा महिन्यांनी योग्य प्रकारे तपासण्या होऊन त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण होणे आवश्यक असताना मनुष्यबळाअभावी व तपासणीचे अधिकार फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच असल्याने पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासण्या होत नसल्याची बाब दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यावसायिक आस्थापनांचे तपासण्या न होताच बहुतांश परवाने दिले जातात तसेच दलातील जवानांच्या प्रशिक्षणाचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) व्यावसायिक आस्थापनांना अग्निशमन दलाच्या वतीने परवाना देण्यात येत नसून त्या जागेमध्ये केलेल्या आग प्रतिबंधक उपाययोजनांच्या दृष्टीने व्यवसायाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते

या आस्थापनांच्या मालक व चालकांनी अग्निशमन दलाकडे अर्ज केल्यास व सदरील आस्थापना ह्या १५ मी. पेक्षा कमी उंची असणाऱ्या असल्यास अशा आस्थापनांचे अर्ज हे त्या त्या परिसरामधील स्टेशन ड्युटी ऑफिसर दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येतात.

संबंधित अधिकारी हे त्या जागेची, तपासणी करुन केलेल्या उपाययोजना पुरेशा व चालू स्थितीत असतील तर त्या आस्थापनेस अग्निसुरक्षेच्या दृष्टीने दलाचे वतीने ना हरकत प्रमाणपत्र देतात.

१५ मी उंचीपेक्षा जास्त उंची असणाऱ्या मॉल, थिएटर, तारांकित/अतारांकित हॉटेल, लॉज यांचेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी अग्निशमन विभागाकडील सहायक विभागीय अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी व मुख्य अग्निशमन अधिकारी हे त्या जागेची, तपासणी करून तसेच या सर्व बाबींची खात्री केल्यानंतरच या आस्थापनांना अग्निसुरक्षेच्या दृष्टीने दलाचे वतीने ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वर्धा शहराकरिता अमृत योजनेंतर्गत अंडरग्राऊंड पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(४६) ११४६४२ (१२-०४-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा शहराकरिता अमृत योजनेंतर्गत अंडरग्राऊंड पाणीपुरवठा योजनेच्या कामाकरिता ४५ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या गुणवत्तेकरिता स्थानिक नागरीक, नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रारी करुन देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपरिषद प्रशासनाने सबंधित कंत्राटदारावर कोणती कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत वर्धा शहराकरिता रु.३५.२६ कोटी निधीचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर आहे.

(२), (३) व (४) • सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा वर्धा नगरपरिषद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आहे.

• प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारींची दखल घेऊन कंत्राटदारास योग्य त्या सूचना देण्यात आल्याचा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व वर्धा नगरपरिषदेने सादर केला आहे.

• तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये तपासणी करण्यात आल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

---

**नवी मुंबई महानगरपालिका दिव्यांग प्रशिक्षण केंद्रास शाळा म्हणून मान्यता असताना ते केंद्र म्हणून चालविले जात असल्याबाबत**

**(४७) ११४७९४ (१२-०४-२०१८). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका दिव्यांग प्रशिक्षण केंद्रास शाळा म्हणून मान्यता असताना ते केंद्र म्हणून चालविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर केंद्र हे शाळा असल्याचे पुरावे नगरविकास विभाग राज्यमंत्र्याकडे वारंवार सादर केले असूनही ती शाळा म्हणून चालविले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरविकास राज्यमंत्र्यांनी सुनावणीच्यावेळी दिव्यांग प्रशिक्षण केंद्र शाळेच्या संहितानुसार चालविण्याचे महानगरपालिकेला आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी संबंधितांवर केव्हा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) • नवी मुंबई महानगरपालिका ईटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र यास अपंग पुनर्वसन केंद्र म्हणून कार्य करण्याकरीता अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत सन २०१२ मध्ये नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असून सन २०१६ मध्ये त्याचे नुतनीकरण झालेले आहे.

• महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. १३३७ अन्वये दि. २२.०२.२०१७ मध्ये ईटीसी केंद्राच्या दिव्यांग मुलांची प्रवेशसंख्या व नियमावलीस मान्यता घेण्यात आली आहे.

• सदर केंद्राच्या व्यवस्थापकीय बाबींवर कार्यवाही करण्याकरीता आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली व्यवस्थापन समिती गठीत करून, या समितीने ईटीसी केंद्राच्या नियमावलीस मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे केंद्राचे कार्य चालते.

(२) व (३) अपंग प्रशिक्षण केंद्र (ईटीसी) केंद्र आहे की शाळा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने मा.राज्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.३१.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागविण्यात आला. आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर संस्था केंद्र म्हणूनच कार्यरत असल्याचे त्यांच्या दि.०६.१२.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील आटपाडी नगरपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(४८) ११४९२७ (०३-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील आटपाडी नगरपंचायत स्थापन करण्याबाबत दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा.नगरविकास राज्यमंत्री यांच्यासमवेत बैठका होउनही अदयाप आटपाडी नगरपंचायत स्थापनेबाबत शासनस्तरावर कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आटपाडी नगरपंचायत स्थापन करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त आटपाडी नगरपंचायत तातडीने स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सांगली जिल्हयातील आटपाडी या तालुका मुख्यालय असलेल्या ग्राचपंचायतीचे नगर पंचायतमध्ये रुपांतर करण्यासाठी दि.०२.०५.२०१८ रोजी शासनाने प्राथमिक उद्घोषणा निर्गमित केली असून यासंर्दभात संबंधित व्यक्तींचे लेखी आक्षेप ३० दिवसात मागविण्यात आले आहेत.

---

**राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करणेबाबत**

**(४९) ११४९४७ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने चार वर्षांपूर्वी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोरणाची अंमलबजावणी अद्यापही न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तातडीने या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१८) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०१३ रोजी फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते.
(२) व (३) केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१४ पासून पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी नियमावली प्रसिध्द केली असून कलम ३८(१) नुसार दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त नियम व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नगर पथविक्रेता समिती गठीत करण्यात येत आहे.

सदर समितीमार्फत पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करणे, पथविक्रीकरीता ठिकाणे/जागा निश्चित करणे, पथविक्री प्रक्षेत्रे निश्चित करुन स्थानिक प्राधिकरणामार्फत फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

---

**अमरावती (जि.अमरावती) महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित भुयारी गटार योजनेबाबत**

**(५०) ११५४१५ (१२-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित भुयारी गटार योजनेच्या कामाकरीता ६४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होवून निविदा प्रक्रीया राबविल्यावर अद्यापही अंतीम मंजुरीकरिता शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य अभियंता मजीप्रा यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी सदस्य सचिव मजीप्रा यांना पत्राद्वारे निविदा स्वीकृत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने निविदा मंजूरीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती शहरासाठी रु.६५.०४ कोटीचा मलनिस्सारण प्रकल्प मंजूर आहे.

• सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

• प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती २१.४५ टक्के जादा दराची लघुत्तम निविदा प्राप्त झाली होती.

• त्यामुळे प्रकल्पाचे अंदाजपत्रक चालु दरसुचीनुसार सुधारित करुन त्यानुसार रु.८१.८७ कोटी किमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**   **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.**   **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.